# पीडितांना मदतीचा हात

पुणे, पीव्हीसी-यू पाइप्स आणि फिटिंग्जची भारतातील सर्वात मोठी उत्पादक कंपनी फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड आणि त्यांचे सीएसआर भागीदार मुकुल माधव फाऊंडेशन यांनी ओडिशा मधील बालासोर येथे अलीकडेच झालेल्या भीषण रेल्वे अपघातात प्रभावित झालेल्या लोकांना मदत करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. अपघात झालेल्या जागेच्या परिस्थितीचे आकलन केल्यानंतर, कटकमधील पीडितांना आणि बाधित लोकांवर उपचार करण्यात गुंतलेल्यांना सर्वसमावेशक मदत करण्यासाठी फिनोलेक्स आणि एमएमएफ एकत्र आले. या भागात रुग्णांची वर्दळ जास्त असल्याने अपघातग्रस्त, त्यांचे नातेवाईक, डॉक्टर्स, परिचारिका, वैद्यकीय सहाय्यक आणि सफाई कर्मचारी यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला.